MHKO070010432010

**रे.क.नं.१९८/२०१०** **आण्णासाहेब भरमू कुंभोजे वि. व्हनगोंडा आण्णा कुंभोजे**

<u>नि.क्र.५० खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे प्रतिवादी नं.१० चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं.१० हे दि.१८/०८/२०१३ रोजी मयत झालेले आहेत. परंतु मयताचे वारस रेकॉर्डवर आणावे लागतात याची माहिती वादी यांनी वकीलांना दिली नाही. त्यामुळे सदर मयताचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा वादी यांनी जाणूनबुजुन केलेला नाही. दावा स्थावर मिळकतीबाबत असल्यामुळे मयताचे वारस मुदतीत रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत व अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केलेली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. विरुध्द बाजुने तीव्र आक्षेप घेतल्याचे दिसून येते. अर्जात नमूद केलेले कारण हे संयुक्तीक वाटत नाही. जरी अर्जात नमूद केलेले कारण हे संयुक्तिक वाटत नसले तरी, प्रस्तुतचे प्रकरण हे उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्देशाने वादीस संधी देणे विधीसंगत वाटते. परंतु, संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना खर्च देणे देखील गरजेचे आहे. करिता खालील

आदेश पारीत करण्यात येतो–

**– <u>आदेश</u> –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.५०) हा वादी यांनी खर्च म्हणून प्रतिवादी यांना र.रू.२००/– (र.रु.दोनशे फक्त) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची पुर्तता झाल्यास सदर कामी झालेला विलंब रद्द समजावा.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.02.10 17:37:02 +0530

दि.१०/०२/२०२५ **(अ.त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

**जयसिंगपूर.**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 10/02/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 10/02/2025. |
| Judgment/order uploaded on | 10/02/2025. |